International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# भाषा व साहित्याच्या दृष्टीतून शाश्वत विकासाचे रूप स्वरूप

**डॉ. युवराज मानकर**
*प्रोफसर, प्रमुख,पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,*
*भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव, जि.यवतमाळ -४४५१०१*
*Corresponding Author – डॉ. युवराज मानकर*
DOI - 10.5281/zenodo.15251076

**प्रस्तावना:**

शाश्वत म्हणजे खरे,चिरंतन! या विश्वात कोणता विकास चिरंतन टिकणारा आहे.याचे उतर कोणताच नाही असे द्यावे लागेल.त्याचे कारण या सृष्टीत कोणतीच गोष्ट स्थिर व कायम टिकणारी नाही तर सतत बदलणारी आहे.हा या सृष्टीचा नियम आहे.हा नियम या सृष्टीच्या उदयापासून तर या सृष्टीच्या अंतासोबत कायम असणार आहे.त्यामुळे या सृष्टीत आजवर तरी चिरंतन असे काहीही राहिलेले दिसत नाही.सर्वच बदलत गेलेले दिसते असे असतांना आपण शाश्वत विकासाची खरे तर का बरे चर्चा करायची ? जिथे माणसाचा भरोसा नाही.तो कधी गचकेल कधी नाही याची सुत्राम शक्यता नाही.तसेच या माणसाने निर्माण केलेल्या मानवनिर्मित गोष्टींची काय शाश्वती देता येणार ? तरीही आपण शाश्वत विकासाची चर्चा करतो.ही बाबच रात्रीत दिवस पाहण्या सारखी आहे.असे असतांनाही केवळ या अर्थावर विसंबून न राहता आजच्या काळात अनेकांना शाश्वत विकासाचे स्वप्न का पडते,या संकल्पनेचा कोणता आणि कसा अर्थ लावला, यासाठी आजच्या काळातील शाश्वत विकास म्हणजे काय ? हे जाणून घेणे आवश्यक आहे.भाषा व साहित्याच्या दृष्टीतून शाश्वत विकासाच्या रूप आणि स्वरुपाची चर्चा येथे करण्याचा प्रयत्न केला आहे .

खरे तर शाश्वत विकासाच्या संकल्पनेबाबत आंतर महाजालावर शोध घेतला असता त्यात या संकल्पनेविषयी कृत्रिम बुद्धिमत्तेने काही उत्तर दिलेली आहेत.ते उत्तर ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी जाणून घेणे गरजेचे आहे. “भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा पोहोचू न देता वर्तमान गरजा पूर्ण करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास. हा मानवी विकासाचा एक दृष्टिकोन आहे.शाश्वत विकासात आर्थिक वाढ पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक कल्याण यावर लक्ष केंद्रित केले जाते” असे आंतरमहाजालावरील कृत्रिम बुद्धिमतेने या संकल्पने संबंधी माहिती दिली आहे.यावरून उद्यांच्या पिढयांच्या गरजेच्या पुर्ततेच्या क्षमतांना कोणताही धक्का लागू न देता वर्तमानातील जीवन जगण्याच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे खरा विकास होय.येथे गरजा आहे,पण त्या गरजा उद्या आणि आज यात विभागल्या असून भविष्यातील जीवन जगणाऱ्यांच्या क्षमतेशी बाधा आणणाऱ्या असता कामा नये तर वर्तमानाच्या क्षमता वाढविणाऱ्या आणि जीवन जगणे सुंदर करणाऱ्या असाव्यात अशी अपेक्षा केली आहे.याचा अर्थच वर्तमानाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वर्तमानातील जगणाऱ्याच्या क्षमता वाढविणे म्हणजे शाश्वत विकास करणे होय असे म्हणता येईल.

आता प्रश्न असा निर्माण होतो की, वर्तमानात जगणाऱ्या माणसाच्या गरजा ह्या एकच एक नाही . त्या व्यक्तीपरत्वे अनंत आहेत. त्या पूर्ण कशा करता येईल ? समजा एखाद्याच्या गरजा त्याने त्याच्या क्षमतेने पूर्ण

केल्या आणि दुसऱ्याला त्याच्या क्षमतेनुसार गरजा पूर्ण करता आल्या नाही तर येथे क्षमतेतील व गरज संपादण्याच्या विकासातील विषमता निर्माण होते.ही विषमता जशी सामाजिक असते तशीच ती आर्थिक असते.या विषमतेमुळे मानवी जीवनाचा समतोल बिघडतो आणि जीवनात कमालीचा द्वैष, ताणतणाव,भांडणे,तंटे वाढतात.ती मानवी जीवनाला उपकारक नसतात.ती परस्परांतील सलोखा बिघडवतात.दुरावा निर्माण करतात,त्यामुळे एकमय,एकहदय समाजाचे स्वप्न भंग पावते.हे कोणत्याही देशाला,समाजाला परवडणारे नसते.यासाठी खरे तर गरजांचे वर्गीकरण करणे जसे आवश्यक आहे तसेच त्या गरजा सर्वांनी पूर्ण करण्याच्या क्षमता त्यांच्यात निर्माण होणेही आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर मराठी भाषा व साहित्य मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करते,जेणे करून सर्वांच्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत आणि त्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वांमध्ये सारख्या क्षमता निर्माण झाल्या पाहिजेत,असे झाले तरच सामाजिक जीवनात समतोल निर्माण होऊन सलोखा नांदेल आणि देश अखंड राहील.त्याचे रूप स्वरूप पाहणे आवश्यक आहे .

माणूस हा निसर्गाचे अपत्य मानल्या जातो.निसर्गाने सर्वच मानवाला सारखीच इंद्रिये,अवयव,बुद्धी दिलेली आहे. त्याचा देह,रूप आणि आकारही कमी अधिक प्रमाणात सारखाच आहे.जेथे रूप आणि आकार साम्य असते तेथे एकत्त्व असते.त्याला सारखे मानले जाते.त्यात विविधता नसते.असे असतांना काही जण कुशाग्र बुद्धीचे, काही मध्यम तर काही साधारण बुद्धीचे असतात.त्यांच्या गरजा आणि त्यांच्या क्षमताही कमी अधिक स्वरूपाच्या असतात.यातील काही जण आर्थिक दृष्टया श्रीमंत असतात तर काही जण गरीब असतात,काही जण बौद्धिक दृष्टया श्रीमंत तर काही जण बौद्धिक दृष्टया दरिद्री असतात.आपापल्या क्षमतेनुसार ते आपापल्या गरजा पूर्ण करतात.पण त्यांच्या क्षमतेत व गरजा संपादनात एक समानता नसते.

एक सारखे पणा नसतो.अशी असमानता का निर्माण व्हावी, हा खरे तर चिंतनाचा प्रश्न आहे.हा प्रश्न भाषा व साहित्याने सोडवला का ? भाषा व साहित्य मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कोणत्या क्षमता वाढवते,यासंबंधीचा विचार येथे केला आहे .

मुळात मानवाला जीवन जगण्यासाठी जशी अन्न,वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजांची गरज असते. तसेच त्याला बौद्धिक आणि भावनिक गरजाही असतात.त्या संपादन करण्यासाठी तो आपल्या क्षमता कशा वाढवतो.मुळात जिथे गरज असते तिथे व्यवहार असतो.व्यवहार मग तो कोणताही असो त्या व्यवहाराला एक साधन असते.गरज आणि व्यवहार यांचे नाते साधनाशी जोडलेले असते.आणि साधने व्यवहाराशी जोडलेले असतात.साधन असल्याशिवाय गरज आणि व्यवहारात मैतक्य निर्माण होत नाही.या मैतक्याचा स्वभाव जोडण्याचा आणि गरजांची पूर्तता करण्यांचा आहे. गरज आणि व्यवहारांचा पुल म्हणजे साधन होय. हे साधन महत्प्रयासाने शिकावे लागते.ते शिकल्या शिवाय क्षमता वृद्धी होत नाही.क्षमतावृद्धी झाली नाही तर गरजा संपादन करता येत नाही.गरजा संपादन करता आल्या नाही तर त्याचा विकास झाला असे म्हणता येत नाही.

भाषा व साहित्य हे गरजा आणि व्यवहार पूर्ण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे .कारण कोणत्याही गरजा संपादनासाठी प्रत्येकाला भाषा नावाच्या साधनाचा व्यवहारासाठी उपयोग करावाच लागतो.भाषा या साधनाचा उपयोग करायचा असेल तर त्याला त्याची भाषा शिकावीच लागते.त्या भाषेचा व्यवहारात कसा,कुठे,उपयोग केला जातो हे त्याला समजून घ्यावेच लागते.त्याला त्या भाषेचा इतिहास,भूगोल माहित करून घ्यावा लागतो.त्याला त्या भाषेचे लिपी ज्ञान शिकावे लागते,त्याला त्या भाषेचा रचनाबंध अवगत करावा लागतो.त्याला त्या भाषेचे विविध ठिकाणी केलेले उपयोजन समजून घ्यावे

लागते.त्याला त्या भाषेचे व्याकरणही समजून घ्यावे लागते,त्याला त्या भाषेचे सामर्थ्य,तिची क्रांतीकारकता,तिच्यातून विचार करण्याचे, मांडण्याचे कौशल्य हस्तगत करावे लागते.त्याला त्या भाषेचे उच्चारशास्त्र आणि लेखनशास्त्र समजून घ्यावे लागते.एकूणच भाषेची प्रकृती वेशिष्ट्ये समजून घ्यावी लागतात.हे समजून घेतल्या शिवाय कोणाच्याही व्यवहारिक क्षमता वाढणार नाही आणि त्याला त्याच्या गरजा संपादन करता येणार नाही.गरजा संपादनासाठी आणि व्यवहार योग्य होण्यासाठी श्रवण,वाचन,संभाषण आणि लेखन ही भाषिक कौशल्य आत्मसात करणे आणि त्याचे अचूक वापर ज्ञान असणे नितांत गरजेचे आहे.भाषिक कौशल्य शिकल्या शिवाय मानवाच्या गरजा पूर्ण होणार नाही आणि त्याचा शाश्वत विकास होणार नाही.शाश्वत विकासासाठी भाषा या साधनाचे आणि या साधनाद्वारे निर्माण झालेल्या साहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शाश्वत विकासाकडे प्रवास करणाऱ्या पांथस्थाने भाषेकडून काय शिकावे तर त्याने त्या भाषेतील अक्षर,अक्षरातून शब्द,अनेक शब्दातून वाक्य,अनेक वाक्यातून परीच्छद,अनेक परीच्छदातून दीर्घ एखादे लेखन याच्यातील संघटन व भावनिक नि वैचारिक आशयाचे संघटन म्हणजे रूप आणि आशय यांचे संघटन आत्मसात केले की भाषा व साहित्याची निर्मिती होते.ही निर्मिती म्हणजे विकास होतो,तसेच या नियमबद्ध संघटन तत्त्वाचा माणसाने अवलंब केला की त्याचा शाश्वत विकास होतो.हे शाश्वत विकासाकडे प्रवास करणाऱ्याने भाषा व साहित्याकडून शिकावे ,याचा अर्थ शाश्वत विकास हा नियमबद्ध चौकटीच्या अंमल
बजावणीत असतो.

खरे तर भाषा व साहित्य हे सर्जनक्षम असतात.सर्जन प्रेरणा हे त्यांचे सत्व असते.भाषा व साहित्याच्या दृष्टीतून शाश्वत विकासांचा विचार करतांना मानवाची भावनिक नि बौद्धिक भूक क्षमविण्याचे कार्य साहित्य करते.साहित्य या शब्दातच सहित हा शब्द आहे.त्याचा अर्थ सोबत,बरोबर, हितासह असा होतो.याचा अर्थ साहित्य सर्वच मानवाच्या भावनिक आणि बौद्धिक गरजा सारख्या प्रमाणात पूर्ण करण्याचे कार्य करते आणि सर्वांना बरोबरीत आणण्याचे, नेण्याचे काम करते.कोणीही मागे राहू नये आणि कोणीही पुढे जाऊ नये तर सर्वांनी बरोबरीने,सोबत सोबत पुढे जावे ही आदर्शवत इच्छा साहित्याच्या अंतर्मनात सतत वाहत असते आणि त्या प्रतिज्ञेपोटीच साहित्य जन्माला येत असते.मानवाच्या भावनिक आणि बौद्धिक गरजांची पूर्तता साहित्य करते.खरे तर वाणी आणि लेखनी.या दोन साधनावर ज्याचे प्रभूत्व आहे, त्याचा शाश्वत विकास होतो.आणि त्याचा शाश्वत विकास झाला की नाही याचे देखील मूल्यमापन वाणी आणि लेखणी या दोन प्रमाणावरून करता येते.शाश्वत विकासासाठी वाणी अर्थात भाषा यावर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.तसेच साहित्यावरही प्रभूत्व असणे आवश्यक आहे.साहित्य हे मानवांच्या गरजांची पुर्तता करण्यासाठी त्याच्या क्षमता वृद्धीगंत करण्याचे काम करते.मानवी गरजा त्याच्या क्षमतेने,कौशल्याने त्याला पूर्ण करता येतात.त्या पूर्ण झाल्या की शाश्वत विकास झाला असे साधारणतः मानले जाते.साहित्य मानवाच्या गरजा संपादन करण्यासाठी त्याच्या कोणत्या क्षमता वाढवते यासंबंधी विचार करतांना साहित्य सर्वच मानवाला बरोबरीत आणण्यासाठी त्याला मूल्यांचे शिक्षण देते,स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये त्याच्या मनावर बिंबवते आणि त्याला सांगते की जीवनात समता असावी, आपल्या गरजा संपादन करण्यासाठी सर्वांना स्वातंत्र्य द्यावे, स्वातंत्र्यामुळे माणूस आपल्या गरजा संपादनासाठी धडपड करू शकतो.त्याच्या त्या धडपडीतून त्याच्या क्षमता वाढतात आणि त्याच्या गरजा पूर्ण होऊन त्याचा शाश्वत विकास होतो.आणि जीवनात समता निर्माण होते.भाईचारा निर्माण होते.सर्वांना सारखाच न्याय मिळतो.साहित्य हे मानवाची जीवन जाणीव समृद्ध करते.मानवाच्या जीवन जगण्यात त्याच्या जाणिवा जेवढ्या समृद्ध असतील तितके त्याचे जीवन समृद्ध होते.जाणीव ही माणसाला

परिस्थितीची जाण करून देते,त्या जाणण्यातून माणूस शहाणा होतो.म्हणजे काय चांगले नि काय वाईट याचा निर्णय घेण्याचे शहाणपण त्याला मिळते.या शहाणपणातूनच माणूस कोणती गरज अत्यावश्यक आहे आणि कोणती गरज अत्यावश्यक नाही याचा सारासार विचार करतो.आणि गरजांवर नियंत्रण ठेवून गरजांची क्रमवारी ठरवतो.अत्यावश्यक गरज संपादन करतो.गरजांची क्रमवारी ठरविण्यासाठी विवेक क्षमतेची वाढ करण्यात साहित्याचे मोलाचे योगदान राहिले आहे.

साहित्य मानवाच्या अभिरूची क्षमतेत वाढ करते.म्हणजे माणसाला एखादी गोष्ट आवडते त्याची पूर्तता तर साहित्य करतेच पण जे आवडत नाही त्याच्या बद्दलही रूची वाढविण्याचे काम करते.त्यामुळे अभिरूची क्षमता वाढली की माणूस चांगल्या जीवनासह वाईट जीवनही समजून घेतो आणि इतरांच्या वाईट जीवनापेक्षा आपले जीवन चांगले आहे अशी तुलना करून आपल्या गरजा मर्यादित करतो आणि त्यात आनंदी राहतो.साहित्य माणसाला आसक्तीतून अनासक्त करते,त्याला परिग्रहातून अपरिग्रह करते.आणि मानवांच्या अनंत इच्छा,आकांक्षा,गरजांना नियंत्रित करते.साहित्य माणसाला विचारशील,बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकवादी, विज्ञानवादी बनवते. त्याच्या या क्षमता वाढल्या की त्याच्या भौतिक विकासापेक्षा नैतिक विकास हाच त्याचा खरा शाश्वत विकास ठरतो.

**समारोप** :

पण माणसाच्या गरजा ह्या कधीही संपत नसतात.त्या अमर्याद असतात.एक गरज संपली की दुसरी गरज तयार होते.या गरजेच्या पोटी माणसाने भाषा व साहित्याद्वारे ज्ञानाची निर्मिती केली,सत्याचा शोध घेतला.ज्ञान आणि सत्य याला मरण नाही एका ज्ञानाची जागा दुसरे ज्ञान घेते तसेच एका सत्याची जागा दुसरे सत्य घेते.पण ज्ञान आणि सत्य हे मूल्य कायमच असते.त्याला कधीही मरण नसते.ते फक्त पहिल्या जागी दुसरे बसते.त्यामुळे ते अंतिम जरी नसले तरी त्याचे अस्तित्त्व मात्र कायम असते.ज्याचे अस्तित्त्व कायम असते ते खरे असते.ते चिरंतन असते.माणसे येतील आणि जातील पण ज्ञान,सत्य आणि मूल्य यांचे अस्तित्व मात्र कायमच असणार आहे.भाषा व साहित्याने अशाच ज्ञानाची, सत्याची आणि मूल्यांची निर्मिती केली आहे.माणसाच्या गरजांना नियंत्रित केले.नियंत्रित गरजाना संपादण्यासाठी त्याच्या क्षमतांना विधायक रूप आणि स्वरूप प्राप्त करून दिले.अनिष्टांकडून इष्टांकडे त्याला नेले.तुकड्या तुकड्या मध्ये राहणाऱ्या माणसाला भाषा व साहित्याने जोडले, त्याला ज्ञान आणि सत्याच्या प्रमाणबद्धतेवर अखंड ठेवले. त्याला एकमय आणि एकहृदय केले.यातच त्याचा खरा विकास दडलेला आहे हे सांगितले.सांगितलेले हे सत्य या वर्तमानातील स्वतःला शाश्वत समजणारा विकास ऐकेल ही अपेक्षा !!